**आगामी गणेशोत्सव कालावधीत “कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गणेशोत्सवानिमित्त पथकर (Toll) माफी व इतर सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत.”**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**परिपत्रक क्रमांक.खाक्षेस-२०२४/प्र.क्र.३२९/रस्ते-८**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०२४

**परिपत्रक**

आगामी सन-२०२४ च्या गणेशोस्तव कालावधीत “कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गणेशोस्तवानिमित्त पथकर (Toll) माफी व इतर सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी सुचना व निर्देश **दिले आहेत.** त्यास अनुसरुन सर्व संबंधितांना सदर परिपत्रकाद्वारे पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. सन २०२४ च्या गणेशोस्तवाकरिता कोकणात जाणाऱ्या भाविकांना / वाहनांना पथकरातून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने **दि.०५.०९.२०२४ ते दि.१९.०९.२०२४** या कालावधीत मुंबई बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग (राम-४८), मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग (राम-६६) वरील व इतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर कोकणात जाणाऱ्या गणेशोस्तव भाविकांना / वाहनांना तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना सवलत देण्यात येत आहे.

अ) याकरिता सोबत जोडल्याप्रमाणे “गणेशोस्तव २०२४, कोकण दर्शन” अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पासेस त्यावर गाडी क्रमांक. चालकाचे नांव असा मजकूर नमूद करुन ते स्टीकर्स (**पासेसचा नमुना सोबतचे जोडपत्र - अ प्रमाणे**) आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधीत प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ) यांनी समन्वय साधून पोलीस स्टेशन, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. ऑफिसेस मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच सदरचे पास परतीच्या प्रवासाकरीता ग्राह्य धरण्यात येतील.

ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची वाहने महाराष्ट्रातील ज्या जिल्हयातून येणार आहेत तेथील पोलीस खाते किंवा प्रादेशिक परिवहन खाते यांचेकडे पासेस **वरील “अ” प्रमाणे** उपलब्ध करुन देण्यात येतील. संबंधित जिल्हयातून गौरी-गणपती वाहतूकीसाठी रवाना होणाऱ्या सर्व बसेसना पथकर माफी असलेले पासेस संबंधित वाहनांस लावून/चिकटवून सदरच्या बसेस रवाना होतील.

२. ग्रामीण वा शहरी पोलीस / प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे मार्फत दिले जाणाऱ्या पासेसची संख्या बाबतीत एकत्रित माहिती उप सचिव (खा.र.१), सार्वजनिक बांधकाम विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीकरिता सादर करावी.

३. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोस्तवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती जनतेस होण्याकरीता आवश्यकतेप्रमाणे अधिसूचना / जाहीर प्रसिध्दी करावी.

या सुचना सर्व संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९०४१७३३०४९४१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: CN = SACHIN MANIKRAO CHIVATE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PUBLIC WORKS DEPARTMENT
Date: 2024.09.04 17:35:43 +05'30'

**( सचिन चिवटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव.
२) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव.
४) मा.मंत्री, सा.बां., महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, सा.बां.(सा.उ.), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव

**प्रत :-**

१) मा. अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव, (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. प्रधान सचिव, नगर विकास - १ / २, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) मा. सचिव (बांधकामे/ रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव (खार-१/ खार-२/रा.म.) सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) मा. मुख्य अभियंता (पथकर प्रशासन विभाग) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, वांद्रे, मुंबई.
१०) मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई/ कोकण.
११) मा. मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई/ कोकण.
१२) मा. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे/ सातारा/ पनवेल.
१३) मा.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ कोल्हापुर/ पुणे/ सातारा.
१४) मा. जिल्हाधिकारी, रायगड/ पुणे/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ कोल्हापुर/ सातारा/ ठाणे.
१५) मा. पोलीस आयुक्त, ठाणे/ ठाणे (ग्रामीण)/ मुंबई.
१६) मा. पोलीस अधीक्षक, ठाणे/ रायगड/ पुणे/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ कोल्हापुर/ सातारा
१७) मा. पोलीस अधीक्षक (लोहमार्ग)
१८) मा. पोलीस उपायुक्त (वाहतूक)
१९) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ कोल्हापुर/ पुणे / सातारा.

**जोडपत्र - अ**

## कोकण गणेशोत्सव - २०२४

## “गणेश दर्शन”

## पथकर माफी (टोल फ्री) पास

**वाहन क्र.** :

**मालकाचे नाव** :

**भ्रमणध्वनी क्र.** :

**मार्ग** : ते

**प्रवासाची तारीख** : **जाण्याची तारीख**
**येण्याची तारीख**

**प्रभारी अधिकारी यांची सही व शिक्का**